नियमित फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- क्रिष्णा
नि.क्र. २७.

**<u>बचाव पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

**<u>मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव - प्रमोद दाजीबा गणविर,
वय ४२ वर्षे, व्यवसाय – पोलीस पाटील,
राहणार – धामणगाव विद्या मंदिर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>आरोपी तर्फे सर तपासणी-त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला, त्याच्या पत्नीला व फिर्यादीला ओळखतो. ते लोक माझ्या गावचे आहेत. घटना दोन वर्षांपूर्वीची आहे. त्यावेळी आरोपीची पत्नी व फिर्यादी गणेश रंगारी यांचे प्रेमसंबंध होते. त्यावेळी गणेश रंगारी असे म्हणत होता की, माझे आरोपीच्या पत्नीशी प्रेमसंबंध असल्यामुळे मी तिला ठेवायला तयार आहे. त्यावेळी तंटामुक्ती समितीची बैठक घेतली होती. त्या बैठकीला मी, तंटामुक्ती अध्यक्ष माणीकरावजी चौधरी व इतर गावातील लोक उपस्थितीत होते. त्यावेळी गणेश रंगारी याचे म्हणणे होते की, मी आरोपीच्या पत्नीसोबत लग्न करेन पण पोरं ठेवणार नाही. त्यावेळी आरोपी म्हणाला की, त्याच्या पत्नीला लग्न करायचे असल्यास तिने मुलांनाही न्यावे. त्यावेळी गणेश रंगारी हा मुलांना घेऊन जाण्यास तयार नव्हता. त्यावेळी त्यामध्ये समझोता झाला.

सरततपास संपला.

**<u>उलट तपास सरकार पक्षातर्फे वकील श्री. एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

२. मी पोलीस पाटील आहे. मी गावात एखादी गुन्हा घडल्यास त्याकरिता पोलिसांना खबर देतो व मदत करतो. मी घटनेच्यावेळी पोलीस

चौकशी करायला आले तेव्हा त्यांना समझोताबाबत सांगितले नाही कारण तो घटनेपूर्वीच झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या पत्नीने कधीही तंटामुक्तीत तिचे प्रेमसंबंध असल्याबाबत कधीही कबूल केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने कधीही म्हटले नव्हते की, आरोपीच्या पत्नीसोबत त्याचे प्रेमसंबंध आहे व त्याच्या मुलांना ठेवणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीसोबत चांगले संबंध असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेबाबत पोलिसांना खबर दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना जाणीवपूर्वक बयान दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला निर्दोष करण्यासाठी खोटी मदत करीत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १६.०१.२०२६.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.